# महाराष्ट्र शासन
# वनविभाग

## वनविभागातील गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात
**जाहिरात क्रमांक - कक्ष-२(१)/आस्था/प्र.क्र.४४८/०९-१०/ २१७४ दिनांक :- ०६/०१/२०१०**

उत्तर चंद्रपूर वनवृत्ताचे गडचिरोली आणि वडसा वनविभाग व दक्षिण चंद्रपूर वनवृत्ताचे आलापल्ली / सिरोंचा / भामरागड वनविभाग यांचे अधिपत्याखालील नमुद गट-क संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व वनविभागात भरतीसाठी इच्छुक उमेदवारांनी सोबतच्या विहीत नमुन्यातील आपला अर्ज पत्र व्यवहाराकरीता जाहिरातीतील मुद्दा क्रमांक ८ मध्ये नमुद पत्यावर दिनांक २७/०१/२०१० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावा.

१) **रिक्त पदांचा तपशील**

| संवर्ग | वनविभागाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड. | इ.मा.व. | विमाप्र | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वनरक्षक | आलापल्ली | .. | १० | .. | .. | .. | .. | .. | २ | ८ | २० |
| | सिरोंचा | ४ | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १७ | २१ |
| | भामरागड | ५ | ४ | .. | .. | .. | .. | .. | .. | २२ | ३१ |
| | गडचिरोली | .. | ३ | .. | .. | .. | .. | .. | .. | ५ | ०८ |
| | वडसा | २ | १ | .. | .. | १ | .. | .. | .. | १० | १४ |
| | **एकुण :-** | **११** | **१८** | **..** | **..** | **१** | **..** | **..** | **२** | **६२** | **९४** |
| वाहन चालक | सिरोंचा | २ | ३ | १ | .. | .. | .. | १ | .. | ३ | १० |
| | भामरागड | १ | १ | .. | .. | .. | .. | १ | .. | ४ | ७ |
| | **एकुण :-** | **३** | **४** | **१** | **..** | **..** | **..** | **२** | **..** | **७** | **१७** |
| महावत | आलापल्ली | १ | १ | १ | .. | .. | .. | १ | .. | ३ | ७ |
| | सिरोंचा | १ | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १ |
| | **एकुण :-** | **२** | **१** | **१** | **..** | **..** | **..** | **१** | **..** | **३** | **८** |
| करवत्या | आलापल्ली | .. | .. | .. | १ | .. | .. | .. | .. | २ | ३ |
| सॉ-शार्पनर | आलापल्ली | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | २ | २ |
| विजतंत्री | आलापल्ली | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | .. | .. | १ |
| लोहार | आलापल्ली | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | १ |
| मिश्रक | आलापल्ली | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | १ |
| प्रसविका | आलापल्ली | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | १ |
| फिटर | सिरोंचा | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | १ | १ |
| | **एकंदर :-** | **१६** | **२३** | **२** | **१** | **१** | **..** | **४** | **२** | **८०** | **१२९** |

२) उपरोक्त उल्लेखीत पदांमध्ये ३०% महिला आरक्षित आहेत.

३) उपरोक्त पदांसाठी समातंर आरक्षण खालील प्रमाणे आहे.

| संवर्ग | वनविभागाचे नांव | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | होमगार्ड | माजीसैनिक | खेळांडू | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वनरक्षक | आलापल्ली | १ | .. | १२ | ३ | १ | १७ |
| | सिरोंचा | १ | .. | ९ | ३ | १ | १४ |
| | भामरागड | २ | .. | ८ | ५ | १ | १६ |
| | गडचिरोली | २ | ४ | २ | .. | .. | ०८ |
| | वडसा | ६ | २ | ६ | .. | .. | १४ |
| | **एकुण :-** | **१२** | **६** | **३७** | **११** | **३** | **६९** |
| वाहन चालक | सिरोंचा | .. | .. | .. | १ | १ | २ |
| | भामरागड | .. | .. | .. | १ | .. | १ |
| | **एकुण :-** | **..** | **..** | **..** | **२** | **१** | **३** |
| | **एकंदर :-** | **१२** | **०६** | **३७** | **१३** | **४** | **७२** |

टिप १):- उमेदवारांनी अर्ज सादर करतांना उत्तर चंद्रपूर वनवृत्तातील गडचिरोली आणि वडसा व दक्षिण चंद्रपूर वनवृत्तातील आलापल्ली, सिरोंचा व भामरागड या वनविभागाकरीता वेग-वेगळे अर्ज परिच्छेद क्रमांक ८ नुसार नमुद पत्त्यावर पाठवावे.

टिप २) :- जरी निवड समिती उपरोक्त विभागासाठी एक असली तरी पात्र उमेदवारांना ज्या विभागामध्ये प्रथम नियुक्ती झाली त्या विभागा व्यतिरीक्त इतर कोणतेही विभागामध्ये स्थानांतरण होणार नाही.

**वेतनश्रेणी**

**गट-क**

| | | | |
|---|---|---|---|
| १) वनरक्षक | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १८००/- |
| २) वाहन चालक | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००/- |
| ३) महावत | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १८००/- |
| ४) करवत्या | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००/- |
| ५) सॉ-शार्पनर (आरातिक्ष्णक) | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००/- |
| ६) विजतंत्री | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००/- |
| ७) लोहार | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००/- |
| ८) फिटर (जोडारी) | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००/- |
| ९) मिश्रक | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन २८००/- |
| १०) प्रसविका | :- | रु. पी.बी.-१ | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००/- |

**किमान शैक्षणिक अर्हता - गट-क चे पदासाठी**

१) वनरक्षक :-
अ) उमेदवार हा एस.एस.सी. (१०वी) किंवा समकक्ष शासनमान्य परिक्षा उत्तीर्ण असावा.
ब) उमेदवारास मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.

२) वाहन चालक :-
अ) उमेदवार हा इयत्ता ४ वर्ग उत्तीर्ण असावा.
ब) हलके व जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असावा.
क) कमीत-कमी ३ वर्ष वाहन चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
ड) गडचिरोली जिल्ह्याची भौगोलिक स्थितीची माहिती असणे आवश्यक.
इ) उमेदवारास मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.

३) महावत :-
अ) उमेदवार हा सुशिक्षीत असावा.
ब) हत्ती हाताळणे व त्याची देखभाल करण्याचा कमीत-कमी ३ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असावा.
क) उमेदवारास मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.
ड) खुल्या प्रवर्गासाठी उमेदवाराचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नासावे.

४) करवत्या :-
अ) उमेदवार हा इयत्ता ४ था वर्ग उत्तीर्ण असावा.
ब) उमेदवार हा सुदृढ शरिरयष्टी असलेला असावा.
क) आरागिरणीमध्ये करवत्याचे काम केल्याबाबत १ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे.
ड) उमेदवारास मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.
इ) खुल्या प्रवर्गासाठी उमेदवाराचे वय ३५ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

५) सॉ-शार्पनर (आरातिक्ष्णक)
अ) उमेदवार हा इयत्ता ४ था वर्ग उत्तीर्ण असावा.
ब) आरातिक्ष्णक कामाचा २ वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे.
क) उमेदवारास मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.
ड) खुल्या प्रवर्गासाठी उमेदवाराचे वय ३५ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

६) विजतंत्री
अ) उमेदवार हा एस.एस.सी. (१०वी) किंवा समकक्ष शासनमान्य परिक्षा उत्तीर्ण असावा.
ब) शासकिय मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इलेक्ट्रीशियन या ट्रेडमधील प्रमाणपत्र पाठ्यक्रम उत्तीर्ण असावा.
क) इलेक्ट्रीशियनचे काम केल्याबाबत २ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे.
ड) उमेदवारास मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.
इ) खुल्या प्रवर्गासाठी उमेदवाराचे वय ३५ वर्षा पेक्षा जास्त नसावे.

७) लोहार
अ) उमेदवार हा इयत्ता ४ था वर्ग उत्तीर्ण असावा.
ब) लोहार काम केल्याचे ३ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे.
क) उमेदवारास मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.

८) फिटर (जोडारी) अ) उमेदवार हा इयत्ता १० वा वर्ग उत्तीर्ण असावा.
ब) शासकिय मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या जोडारी या ट्रेडमधील प्रमाणपत्र पाठ्यक्रम उत्तीर्ण असावा.
क) जोडारीचे काम केल्याबाबत २ वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र आवश्यक आहे.
ड) उमेदवारास मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता आली पाहिजे.

९) मिश्रक A) Have passed the S.S.C. or an equivalent examination recognized by the University or Board.
B) The examination of practicing pharmacist training course conducted by the Indian pharmaceutical association Maharashtra state branch or have registered their names in the Maharashtra state pharmacy council.

१०) प्रसविका अ) उमेदवार हा एस. एस. सी. (वर्ग १० वा) पास असावा.
ब) A candidates shall be qualified midwife for appointment, A Midwife registered with the Bombay Nurses midwives and health visitors council.
क) शासनमान्य संस्थेकडून संगणकाची परिक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

जाहिरातीत नमुद केलेल्या पदसंख्या पुढील एक वर्षात रिक्त होणाऱ्या पदांवर आरक्षित असल्याने सदर नियुक्ती या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबुन राहील. तसेच जाहिरातीत उल्लेख केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१.० **वयोमर्यादा** :- उमेदवाराचे वय दिनांक ३१/१२/२००९ रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल वर नमुद पदामध्ये दिलेला नाही तिथे ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. होमगार्ड असलेल्या उमेदवारांकरीता वयोमर्यादा प्रचलित असेलेल्या नियमानुसार.

१.१ **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथीलक्षम.**

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.
(दोन) अपंग उमेदवाराच्या बाबतीत ४५ वर्षापर्यंत.
(तीन) माजी सैनिकाच्या बाबतीत प्रचलित नियमानुसार.
(चार) पात्र खेळाडुंच्या बाबतीत ५ वर्षा पर्यंत.
(पांच) स्वातंत्र्य संग्राम सैनिक पाल्य, धरणग्रस्त/भुकंपग्रस्त पदवीधर /पदवीधारक /अंशकालीन कर्मचारी उमेदवाराच्या बाबतीत शासन नियमातील तरतुदीनुसार.
(सहा) सुशिक्षित बेरोजगारांना कमाल वयोमर्यादा सवलती, पसंतीक्रम व गुणात सवलत शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार.
(सात) वनविभागातील अधिसंख्या वनमजुराकरीता प्रचलीत नियमानुसार.

२.० **वनरक्षक पदासाठी शारिरीक पात्रता**

(i)

| उमेदवार | उंची | छाती न फुगवता | छाती फुगवून (किमान ५ से.मी. फुगविता येणे आवश्यक) |
|---|---|---|---|
| पुरुष | १६३ से.मी. | ७९ से.मी | ८४ से.मी |
| महिला | १५० से.मी | ७४ से.मी | ७९ से.मी. |
| (अनुसूचित जमातीचे उमेदवारासाठी) | | | |
| पुरुष | १५२.५ से.मी | ७९ से.मी. | ८४ से.मी |
| महिला | १४५ से.मी | ७४ से.मी | ७९ से.मी. |

(ii) **सुधारणेनंतर (आफ्टर करेक्शन)** - ४.०० D सह प्रत्येक डोळ्यांची दृष्टी तिक्ष्णता (व्हीज्युअल ॲक्विटी) ६/६ असावी. बाह्य डोळ्यावर कोणतेही रोग संक्रमन झालेले नसावे, किवा तिरळेपणा नसावा.

३.० शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, यांच्या कडील पत्र क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र. ६१-२००१/३९ दिनांक १९ मार्च २००३ नुसार गट- क मधील नव्याने नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत प्राप्त करणे अनिवार्य राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल (वनरक्षक, वाहनचालक, महावत पदे वगळून.)

४.० **निवडीची पध्दत** :- वर अधिसूचित केलेल्या रिक्त पदासाठी खालील प्रमाणे निवड पध्दत अवलंबविण्यात येईल.

४.१ अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यत प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननीनंतर वनरक्षक पदासाठी सेवा प्रवेश नियमानुसार पात्र उमेदवारांची चाळणी परिक्षा घेण्यांत येईल. पात्र ठरलेल्या उमेदवारांना ५००० मीटर धावण्यांची शर्यत एक संधीत खाली नमूद विहीत वेळेत पूर्ण करणे अनिवार्य राहील.

**पूरुष :- ३० मिनिट** **महिला :- ४५ मिनिट**

सदर स्पर्धेत यशस्वी झालेले उमेदवारच वनरक्षक या पदासाठी पुढील टप्यांची अभियोग्यता परिक्षेत बसण्यांस पात्र राहतील.

४.२ गट-क मधील वनरक्षक पदा व्यतिरीक्त इतर ज्या तांत्रिक पदाची शैक्षणिक अर्हता १० वी आहे त्यासाठी व्यावसायीक चाचणी परिक्षा ८० गुणांची व मौखिक परिक्षा २० गुणांची राहील. ज्या पदाची शैक्षणिक अर्हता १० वी पेक्षा कमी आहे त्यामध्ये ५० गुणांची व्यवसायाशी निगडीत परिक्षा व ४० गुणांची शारिरीक क्षमतेची चाचणी व १० गुणांची मुलाखत अशी राहील. तसेच जर सदर पदासाठी शारिरीक क्षमतेची चाचणी परिक्षा नाही, त्यांचे करीता व्यावसायीक परिक्षा ही ९० गुणांची राहील.

४.३ वनरक्षक पदाकरीता लेखी परिक्षा २०० गुणांची व वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न असलेली ३ तासाची राहील.

अ) वनरक्षक पदासाठी अभियोग्यता परिक्षा खालील विषयावर आधारीत राहील.

१) सामान्यज्ञान :- संबंधीत जिल्हा / प्रादशिक क्षेत्राशी निगडीत महत्वाच्या बाबी संबंधी सर्वसाधारण माहिती (५० गुण)

२) अंकगणित :- अंकगणित व संख्ये विषयीचे प्रश्न सोडविणे ( ५० गुण)

३) मराठी भाषेचे ज्ञान :- मराठी भाषेचे सर्वसामान्य ज्ञान व आकलन शक्ती (५० गुण) ( दहावी समकक्ष)

४) इंग्रजी भाषेचे ज्ञान :- इंग्रजी भाषेचे ज्ञान व आकलन शक्ती (५० गुण)

४.४ मौखिक परिक्षेकरीता गट-क पदासाठी लेखी परिक्षेच्या आधारावर (खुल्या व सर्व आरक्षित पदांकरीता-४५% गुण) लघुयादी तयार करण्यांत येईल.

**लघुयादीतील उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे असेल :-**

| | |
|---|---|
| १) रिक्त पदाची संख्या ५ पदापर्यंत :- | मुलाखतीसाठी बोलवावयाच्या उमेदवारांची संख्या रिक्त पदाच्या संख्येच्या ५ पटीत मात्र उमेदवारांच्या १५ इतक्या संख्येपर्यंत मर्यादित. |
| २) ६ व त्याहून अधिक पदासाठी :- | रिक्त पदाच्या ३ पटीत. |

४.५ वनरक्षक पदासाठी तयार करण्यांत आलेल्या लघु यादीतील उमेदवारांची शारिरीक मोजमाप व शारिरीक क्षमतेची चाचणी घेण्यात येईल. शारिरीक मोजमापात पात्र ठरलेल्या उमेदवारांना शारिरीक क्षमतेची चाचणी पुरुष २५ कि.मी. व महिला १६ कि.मी. चार तासात यशस्वीरित्या चालुन पूर्ण करणे अनिवार्य राहील.

४.६ परिच्छेद ४.५ प्रमाणे पात्र उमेदवारांची गट-क पदासाठी तसेच गट-क मधील इतर पदासाठी परिच्छेद ४.४ नुसार तयार केलेल्या लघु यादीतील उमेदवारांची पदाच्या आवश्यकतेनुसार उमेदवाराचे व्यक्तीमत्व, क्रिडा व सांस्कृत्तीक कार्य, विशेष कार्यक्षमता (उदा. किमान शैक्षणिक अर्हतापेक्षा उच्च शिक्षण / तांत्रिक विषयावरील प्रशिक्षण / संगणकाचे ज्ञान) सामान्य ज्ञान, स्थानिक क्षेत्राचे ज्ञान व पदासाठी उमेदवारांची सर्वसाधारण योग्यता या बाबीसंबंधी मौखिक परिक्षा प्रादेशिक निवड समिती मार्फत घेऊन योग्यता निर्धारीत केली जाईल. उमेदवार मौखिक परिक्षेत अनुपस्थित राहील्यास त्यांना अपात्र ठरवुन त्यांचे नांव गुणवत्तेनुसार तयार केलेल्या निवड यादीतुन वगळण्यात येईल.

४.७ मौखिक परिक्षेनंतर वनरक्षक पदासाठी लेखी परिक्षेच्या व मौखिक परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांची बेरीज करुन गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.

५.० **सर्वसाधारण अटी :-**

५.१ सेवा प्रवेश नियमातील अटीनुसार संबंधीत संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता येणे आवश्यक आहे.

५.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

५.३ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एस.आर.व्ही.-१०९७ /प्र.क्र.३१/९८१/१३-अ, दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.जा.(अ) भज(ब) भज(क), भज(ड), विमाप्र, इमाव आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणाऱ्या राखीव पदांची संख्या पदाचा तपशील या शिर्षा अंतर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व संमातर पदे त्या-त्या सामाजिक प्रवर्गातून भरण्यात येतील.

५.४ विजा(अ), भज(ब), भज(क), भज(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारांसाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय संस्कृतीक न्याय व विशेष साहाय्य विभाग क्र. सी.बी.सी.-१०/२००६/प्र.क्र. १५/मा.व.क.-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारीत नमुन्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नान क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर सुधारीत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यास योग्य समजता येईल. खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्गीय, भटक्या जमाती (क) व भटक्या (ड) या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ती/गटातील (क्रिमीलेअर) कुटूंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

५.५ महिला आरक्षणाकरीता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी त्यांची जात, उन्नत व प्रगत व गटात मोडत नसल्याचे (नान क्रिमिलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५.६ खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू उमेदवारांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागास वर्ग प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

५.७ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर या कार्यालयाकडे विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे अर्ज सादर करावा.

५.८ वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजुरांनी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहे त्या पदाकरीता विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे सरळ मार्गाने अर्ज सादर करावा.

५.९ अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणुन नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

५.१० पडताळणी अंतिम अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवाराची अंतिम निवड करणे जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

५.११ सेवा शर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

५.१२ उमेदवारांना लेखी / व्यावसायीक परिक्षा व मुलाखती करीता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

६.० **सेवाशुल्क**:- अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील वनरक्षक, वाहन चालक, महावत, करवत्या, सॉ-शार्पनर, विजतंत्री, लोहार, फिटर (जोडारी), मिश्रक, प्रसविका या पदासाठी उमेदवाराने रु. २००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांने रु. १००/- चा न्यायालयीन फी मुद्रांक विक्रेत्याचे पावती सोबत जोडणे आवश्यक आहे. क्वचित प्रसंगी उमेदवारास न्यायालयीन फी मुद्रांक मिळणे शक्य नसेल तर रेखांकित भारतीय पोष्टल आर्डर उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे नांवे स्विकारण्यात येईल. (या व्यतिरीक्त बँक डिमांड ड्राप्ट व इतर मुद्रांक फीस म्हणुन ग्राह्य धरण्यात येणार नाही व सदरचे अर्ज रद्द बादल ठरतील) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही.

७.० **अर्ज करण्याची पध्दत** :- सोबत दिलेल्या नमुन्यात ए-४ (३०X२० सेमी) आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एकाच बाजुला हस्त लिखीत / टंकलिखीत व चक्र मुद्रीत करुन अर्ज करावा. उमेदवारांनी अर्जातील माहिती तपशील सुस्पष्टपणे नमुद करावा. उमेदवाराने ओळख पत्रातील छायाचित्राच्या आकाराचे त्यांचे अलिकडचे (३ महिण्या पुर्वीचे) साक्षांकित छायाचित्र आवेदन पत्रावर विहीत जागी घट्ट चिकटवावे. अर्जासोबत पदाच्या संबंधीत किमान शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका, वय, जात, अनुभव व इतर प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे बंधनकारक आहे. अर्जदारांनी स्वत:चा संपुर्ण पत्ता लिहीलेला २२X१० से.मी. आकाराचे २ लिफापे आवश्यक रकमेचे पोष्टेज स्टॅम्प चिकटवून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यामध्ये भरुन पाठविलेले आवेदन पत्र पुढील पत्यावर विहीत केलेल्या अंतिम तारखेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील अशा बेताने पाठवावेत. अर्ज पाठवितांना बाहेरील लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज असेल ते पद स्पष्टपणे लिहावे. विहीत तारीख व वेळेनंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

८.० **अर्ज स्विकारणे** :- उमेदवाराने आपले अर्ज जाहिरातीतील विहीत नमुन्यातील विहीत मुदतीत शक्यतो नोंदणीकृत डाकेने / पोच देय डाक नोंद टपालाने पाठवावे व त्या टपालाची पावती जतन करावी. उमेदवारांना निवड प्रक्रियेच्या टप्पा निहाय वेळापत्रकानुसार विविध चाचण्यासाठी उपस्थित राहावे लागेल. यासाठी उमेदवारास, व्यक्तीगतरित्या वेगळ्याने चाळणी परिक्षा/ अभियोग्यता व्यावसायीक परिक्षेसाठी लेखी पत्र पाठविले जाणार नाही. तथापी वेळापत्रकात बदल झाल्यास त्यांची माहिती शक्य असल्यास वर्तमानपत्रात जाहिरातीने अथवा संबंधीत विभागीय कार्यालयातील सूचना फलकावर लावुन देण्यात येईल. लघु यादीतील उमेदवारांना मौखिक परिक्षेस व शारिरीक क्षमतेच्या परिक्षेसाठी लेखी पोष्टामार्फत कळविण्यांत येईल. अपूर्ण माहिती असलेल्या किंवा अपूर्ण दस्ताऐवज/प्रमाणपत्र/कमी फी/जाहिरातीतील विहीत नमुन्यातील अर्ज नसलेल्या अर्जाचा निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. सेवा प्रवेश नियमानुसार अपात्र उमेदवारांना लेखी सूचना दिल्या जाणार नाहीत. अर्जदाराचे अर्ज खालील पत्यावर स्विकारण्यात येतील.

| दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर करीता | उत्तर चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर करीता |
|---|---|
| १) उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली<br>मु.पो. आलापल्ली, ता. अहेरी, जि. गडचिरोली<br>वनसंपदा इमारत, आलापल्ली (पिनकोड नं. ४४२७०३) | १) उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली<br>मु.पो. गडचिरोली, ता. जि. गडचिरोली<br>(पिन कोड नं. ४४२६०५) |

९.० **भरती बाबत अर्जासाठी इतर आवश्यक सुचना** :-

९.१ प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

९.२ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

९.३ निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार (वनरक्षक, वाहन चालक, महावत पदे वगळता) संगणक परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

९.४ वनरक्षक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना वनरक्षकाचे सेवातंर्गत प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

९.५ महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२००९/प्र.क्र. २९१/०९/१६-ब दिनांक ५ नोव्हेंबर २००९ मधील निर्देशानुसार मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीचे वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

९.६ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविल्या जाईल.

९.७ निवड झालेल्या उमेदवारांची या वनविभागा अंतर्गत ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

९.८ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरीकदृष्ट्या इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

९.९ उमेदवारांनी चाळणी/लेखी/व्यावसायीक परिक्षेच्यावेळी अर्जात दिलेल्या नमुन्यातील ओळखपत्र सोबत आणावे. सदरचे ओळखपत्र सर्व भरती प्रक्रियेसाठी आवश्यक राहील.

९.१० महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एसटीसी-१०९९/प्र.क्र.१४/का-१० दिनांक १६/८/२००० नुसार अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नियुक्तीच्या वेळेस जातीवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जातीवैधता प्रमाणपत्र सादर केल्या नंतरच नियुक्ती देण्यात येईल. तसेच महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, संस्कृतीक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२००३/पत्र क्र. ९१/ मावक-५, दिनांक २४ जानेवारी २००४ अन्वये मागास वर्गीयासाठी (अनुसूचित जमाती वगळुन) राखीव असलेल्या जागेवर निवड केलेल्या उमेदवाराच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत विभागानी करुन घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे त्वरीत सादर करतील व समितीने आपला निर्णय ३ महिण्याचे आंत संबंधीत विभागाकडे सादर करणे अनिवार्य आहे. थोडक्यात, निवड झालेल्या उमेदवारांनी ३ महिण्याचे आंत जाती वैधता प्रमाणपत्र विभागाकडे सादर करणे आवश्यक राहील.

**१०.० तृटी असलेले अर्ज अस्विकृत केले जातील :-**

१) सुवाश्च अक्षरात नसलेले व अपुर्ण किंवा चुकीची माहिती भरलेले अलिकडील छायाचित्र (फोटो) त्यावर राजपत्रित अधिकारी यांचेकडून साक्षांकित न केलेले तसेच उमेदवाराने अर्जावर स्वाक्षरी न केलेले अर्ज.

२) अर्जासोबत किमान शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका (संपुर्ण संधीच्या) वय, जात, अधिवास प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राच्या राजपत्रित अधिकारी यांचेकडून साक्षांकित न केलेले अर्ज.

३) अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक २७/१/२०१० चे सायंकाळी ५.०० वाजेनंतर प्राप्त झालेले अर्ज.

१०.१ **निवड प्रक्रियेचे वेळापत्रक :-**

**निवड प्रक्रियेचा कार्यक्रम (वेळापत्रक) खालील प्रमाणे राहील**

| अ.क्र. | निवड प्रक्रियेचे टप्पा निहाय वेळापत्रक | तारीख |
|---|---|---|
| १ | अर्ज स्विकारण्याची तारीख | दिनांक ०७/०१/२०१० ते २७/०१/२०१० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| २ | पात्र/अपात्र अर्जदारांची यादी जाहिर करणे व उमेदवारास प्रवेशपत्र देणे.<br>१) स्थळ :- उत्तर चंद्रपूर वनवृत्तासाठी उपनवसंरक्षक कार्यालय गडचिरोली.<br>२) स्थळ :- दक्षिण चंद्रपूर वनवृत्तासाठी वनसंपदा इमारत, उपवनसंरक्षक कार्यालय, आलापल्ली वनविभाग. | दिनांक ३०/१/२०१० |
| ३ | १) दक्षिण चंद्रपूर वनवृत्ता अंतर्गत आलापल्ली/ सिरोंचा/ भामरागड वनविभागासाठी अपात्र अर्जदारांची पात्रतेसाठी अपिल अर्ज अध्यक्ष तथा उप विभागीय वन अधिकारी, आलापल्ली यांचेकडे सादर करण्याची अंतिम तारीख.<br>२) उत्तर चंद्रपूर वनवृत्ता अंतर्गत गडचिरोली/वडसा वनविभागासाठी अपात्र अर्जदारांची पात्रतेसाठी अपिल अर्ज अध्यक्ष तथा सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो) गडचिरोली वनविभाग यांचेकडे सादर करण्याची अंतिम तारीख. | दिनांक ३१/०१/२०१० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| ४ | अपिलाचा निकाल देण्याची अंतिम तारीख | दि. ०२/०२/२०१० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत. |
| ५ | वनरक्षक पदाकरीता शारिरीक मोजमाप/शारिरीक पात्रता तपासणी इत्यादीची संभाव्य तारीख.<br>१) स्थळ :- उत्तर चंद्रपूर वनवृत्तासाठी उपनवसंरक्षक कार्यालय गडचिरोली.<br>२) स्थळ :- दक्षिण चंद्रपूर वनवृत्तासाठी वनसंपदा इमारत, उपवनसंरक्षक कार्यालय, आलापल्ली वनविभाग. | दि. ०५/०२/२०१० सकाळी ८.०० ते ३.०० वाजेपर्यत<br>दि. ०६/०२/२०१० सकाळी ८.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| ६ | वनरक्षक पदासाठी ५००० मिटर धावण्याची चाळणी परिक्षा. | दि. ०५/०२/२०१० सकाळी १०.०० वाजेपासुन संपेपर्यंत<br>दि. ०६/०२/२०१० सकाळी १०.०० वाजेपासुन संपेपर्यंत |
| ७ | सर्व पदासाठी लेखी परिक्षेची तारीख<br>स्थळ : (दि. ०८/०२/२०१० रोजी विभागीय कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल.) | दि. १४/०२/२०१० |
| ८ | लेखी / व्यवसायीक परिक्षेअंती लघू यादी जाहीर करण्याची संभाव्य तारीख (निश्चित तारीख वर्तमान पत्रामार्फत सुचना देण्यांत येईल व संबंधीत वनविभागाचे कार्यालयाचे सुचना फलकावर लावून देण्यांत येईल. | दि. २२/०२/२०१० |
| ९ | वनरक्षक पदाकरीता शारीरिक क्षमतेकरीता पुरुष २५ कि.मी व महिला १६ कि.मी. चालणे, ४ तासात पूर्ण करणे. | दि. २८/०२/२०१० |
| १० | मौखीक परिक्षेकरीता पात्र ठरलेले उमेदवार यांचे शैक्षणिक अर्हतेचे दस्तावेज तपासणी. | दि. ०९/०३/२०१० ते १२/०३/२०१०<br>दि. १६/०३/२०१० ते २०/०३/२०१०<br>दिलेल्या शेड्युल नुसार. |
| ११ | मौखिक परिक्षा | दि. ०९/०३/२०१० ते १२/०३/२०१०<br>दि. १६/०३/२०१० ते २०/०३/२०१० |
| १२ | सर्व पदासाठी निवड यादी तयार करुन निकाल जाहीर करणे. | दि. २५/०३/२०१० |

११.० चाळणी परिक्षा / लेखी परिक्षा / व्यावसायीक परक्षिसाठी हजर व्हावयाचे ठिकाण :- सदर परिक्षेचे स्थळ वेगळयाने संबंधीत विभागाच्या कार्यालयाचे सूचना फलकावर जाहीर करण्यांत येईल.

टिप :- नमुद तारखांमध्ये बदल झाल्यास ते विभागीय कार्यालयाचे सूचना फलकावर लावण्यात येईल.

सदस्य सचिव, जिल्हा निवड
समिती,
गडचिरोली
तथा
उपवनसंरक्षक,
आलापल्ली वनविभाग,
आलापल्ली

E:\Esstt Sect\Hadap Work\Jahirat.doc